

# मनोगाथा

अ‍ॅड. रुपेश पवार

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

बोधकथासंग्रह

# मनोगाथा

## लेखक : ॲड. रुपेश पवार



# मनोगाथा

## लेखक : ॲड. रुपेश पवार

पत्ता:

मोबाईल : 9930852165

ई मेल : rupesh.b.pawar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.





प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

Whatsapp: 9987737237

esahity@gmail.com

प्रकाशन : २६ ऑक्टोबर २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.







## लेखक परिचय

ठाण्यातील ॲडवोकेट रुपेश पवार यांना सेलेब्रल पाल्सी हे अपंगत्व आहे, तरी त्यांनी या शारीरिक व्याधीवर मात करून, साहित्य, पत्रकारिता क्षेत्रात आपला एक वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांनी आतापर्यंत कविता, ललित, प्रासंगिक लेख, कथा, चित्रपट, नाटक, कथा, संवाद, निवेदन, संहिता, मुलाखत, लेख लिहिले आहेत. ते उत्तम संवादी निवेदक आहेत. त्याच बरोबर कार्यक्रमांचे आकर्षक बातमी लेखन ही ते करत असतात. या सर्व लेखनातून त्यांनी संवेदनशील साहित्यिक होऊन समाजातील प्रत्येक लहान लहान गोष्टींना समाज भावनेसह उलगडले आहे. त्यांनी कार्यक्रमांचेही संयोजन आयोजन केले आहे. अशा लेखनामुळे रुपेश पवार यांनी साहित्य पत्रकारिता क्षेत्रात नाव कमावले आहे.

त्यांच्या या व्यासंगामुळे त्यांनी विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय संस्थांकडून अनेक प्रकारचे पुरस्कार प्राप्त केले आहेत. त्यांना चाळीसहून अधिक पुरस्कार मिळाले आहेत. महाराष्ट्र मुक्त पत्रकार





संघाचा महाराष्ट्र टीप, ठाणे महानगरपालिकेचा ठाणे गुणीजन, ओम शक्ती पीठ वर्ध्याचा राजीव गांधी सन्मान, आणि नूतन गुळगुळे फाउंडेशनचा अपंग ध्येयपूर्ती गौरव हे यातील ठळक पुरस्कार सांगता येतील.

रुपेश पवार यांनी आजवर चार साहित्य कलाकृती प्रकाशित केल्या आहेत. त्यात अंतरंग काव्यसंग्रह, प्रतिभावंतांच्या रंगसावल्या संपादित लेख संग्रह, वलयांकित ललितसंग्रह, नशा दीर्घ काव्यसंग्रह, अशा प्रकाशित कलाकृती निर्माण केल्या आहेत. त्याचबरोबर रंगभूमीसाठी तयार असलेलं एक कौटुंबिक नाटक त्यांनी लिहिलं आहे. रुपेश पवारांच्या मुलाखती, माहिती देणारे ललितलेख अनेक वृत्तपत्रातून मासिकातून टिव्ही चॅनल वरून प्रसिद्ध झाले आहेत. अशाप्रकारे हे विविधांगी अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. अनेक थोर साहित्यिकांचे आशीर्वाद रुपेश यांना लाभले आहेत. असा हा नव्या दमाचा आश्वासक चेहरा आहे.

अमिता कदम

युवा साहित्यिका

ठाणे.





# अर्पण पत्रिका

मनो भावनांचा आविष्कार
आहे या गाथेत माझ्या
शब्द सुमनांच्या वैभवात
ग्रंथराज अथर्वाने दिला
हा सुंदर कथा कलश
रसिक, वाचक मनांनी घ्यावा
यातून निर्झर अमृतानुभव
आणि कृतार्थ करावे मजला
लाभावा आपला आशीर्वाद
हिच असे सद्गुरु चरणी प्रार्थना





# माझी मनोगाथा **

'मनोगाथा' हा माझा पहिला कथासंग्रह प्रकाशित होत असताना, मला आनंद होत आहे. संग्रह म्हणून ही माझी पाचवी कलाकृती आहे. 'मनोगाथा' हा कथासंग्रह प्रकाशित होण्यामागे दैनिक ठाणेवैभवचा मोलाचा हात आहे. कारण जानेवारी २०२१ ला ठाणेवैभवने माझे "भावस्पर्शी बोधकथा" हे लघुकथा सदर सुरु केले. या लघुकथा ठाणेकरांना फार आवडू लागल्या, फेसबुकच्या माध्यमातून त्या सर्वत्र पोचल्या. त्यातून सकारात्मक प्रतिक्रिया हळूहळू मला मिळत गेल्या. या प्रतिसादातून मला वाचकांच मन जाणता आलं. त्यातूनच पुढे एकातून दुसरे आणि दुसऱ्यातून तीसरे लघुकथा सदर सुरु झाले. या नवनिर्मित कथांचे सत्र सुरु असताना, श्री रामदास खरे यांनी मला इ प्रतिष्ठान या प्रकाशना विषयी सुचवले. त्यानंतर लगेचच मी इ प्रतिष्ठानशी संपर्क साधला. त्यावेळी माझे मित्र सुनील सर म्हणजे आमचे नामकाका प्रकाशक या नात्याने इ प्रतिष्ठानच्या निमित्ताने भेटले. काकांनी मग पुस्तक निर्मिती बाबात योग्य असे सहकार्य केले. त्यामुळे आज माझा इ प्रतिष्ठान प्रकाशन संस्थेकडुन 'मनोगाथा' हा कथासंग्रह प्रकाशित





होत आहे. याकरता मी इ प्रतिष्ठानचे आभार मानतो. या संग्रहात माझ्या दहा लघुकथांचे संकलन आहे.

कविता, ललित लेख, चित्रपटकथा आणि गीतांचे लेखन करत असताना , माझ्या मनात जे कथात्मक चित्र उभे राहिले. त्या चित्रीत भावनांना मी कथारूप देत गेलो. त्यातूनच मग वेगवेगळ्या कथा माझ्याकडून लिहिल्या गेल्या. या भावनिक कथांना दीर्घ न करता, लघुकथेत आणावे, असे मला मनोमन वाटले आणि या लघुकथा हां हां म्हणाता मोबाईल पॅडवर अवतरल्या. हे भावमधुर लेखन, कथा व ललित यांच्या सहज संयोगातून तयार झाले आहे. अशा प्रकारे या हृदयस्पर्शी लघुकथा निर्मिल्या आहेत. जीवन जगताना आपल्याला विविध भावना, संवेदना, प्रसंग, गोष्टी आणि नातेसंबंध या सर्वांचा कायम विचार करावा लागतो. यातून आपल्याला निरनिराळे अनुभव येत असतात अशा सर्व अनुभवांना एकत्र करून, मी या लघुकथा शब्दबद्ध केल्या आहेत. यात सुंदर असा बोधही आहे.।।।

आपण अनेकदा चित्रपट, नाटक यांचा आस्वाद घेत असतो. आजकाल आपण शॉर्टफिल्म सुद्धा आवडीने बघत असतो. या





साऱ्या कलात्मक गोष्टींकडे पाहत असताना. आपल्या मनात सहज एखादी कथा रंगत असते. अशा प्रकारे मनात रंगलेल्या कथांना, लेखक आपल्या परीने शब्दरूप देण्याचा प्रयत्न असतो. परंतु त्या कथा दीर्घ होत जातात. अशा या दीर्घकथा मासिकात, दिवाळी अंकात, विशेषांकात किंवा सोशल मीडियाच्या एखाद्या वेब पेजवर येत असतात. असे जरी होत असले, तरी त्या कथा जागे अभावी कोणत्याही दैनिकात प्रसिद्ध होत नाहीत. कारण रोज येणाऱ्या दैनिकात वृत्तांची, बातम्यांची ललित लेखांची संख्या जास्त असते. यामुळे प्रत्येक वृत्तपत्रांत कॉलमची आणि शब्दांची मर्यादा असते. या मर्यादेत दीर्घकथा बसत नाहीत. त्यामुळे अशा कथा दैनिकात प्रसिद्ध होत नाहीत.

त्याचप्रमाणे हल्ली वाचन संस्कृती लोपपावत चालली आहे. व्हिडिओ, ऑडिओचा जमाना प्रत्येकाच्या हातात आलेला आहे. त्यामुळे वाचन जास्त होत नाही. त्यात दीर्घ वाचन कोण करणार? अशी सध्याची 'नेट' नेटकी संस्कृती आहे. या सर्व गोष्टींना लक्षात घेता, आपल्या वाचकांना वेगळे काही देता येईल का? याचा विचार माझ्या मनात सुरू झाला. त्यातूनच माझ्या मनात ही लघुकथांची संकल्पना येत गेली. याच्या आधी मी काही काव्यकथा लिहिल्या





होत्या. त्या काव्यकथा आणि इतर काही उस्फुर्त कथा यांना विचारात घेऊन मी दहा दिवसात झपाट्याने या लघुकथा लिहित गेलो. त्यातून "भावस्पर्शी बोधकथा" हे सदर पूर्ण झाले. ते सदर मी दैनिक ठाणेवैभवकडे सोपवले. अशा रीतीने या कथा ठाणेकरांच्या समोर आल्या.

या कथा लिहिण्या मागे आणखी एक महत्त्वाचं तात्कालिक कारण आहे. ते कारण कोरोना महामारी हे आहे. या कोरोना काळात वृत्तपत्राची सर्व पाने कोरोनामय झाली होती. ई-पेपर उलगडला की माणसांच्या मनात भीती निर्माण होत असे. अशा काळात लोकांचे आत्मबळ वाढवण्याकरता आपण कोणते विषय निवडावे हा प्रश्न मला पडलेला होता, जरी आपण असे विषय निवडले, तरी त्यात कोरोना हा आजार येणारच. म्हणूनच मी आग्रहाने या लघुकथांकडे वळालो. त्यातूनच वास्तवदर्शी काल्पनिक कथा तयार झाल्या. वाचकांनी या कथांचा आनंदाने आस्वाद घ्यावा, असे माझ्या मनाला वाटत होते. कारण लोकांनी कोरोनाच्या या विचार विळख्यातून जरा तरी बाहेर आले पाहिजे, याकरता माझे प्रयत्न सुरू होते. ते माझे प्रयत्न अल्प प्रमाणात का होईना यशस्वी झाले. याचे मला समाधान आहे. परंतु आजही





कोरोना महामारी तशीच आहे. याचा सर्वार्थाने विचार करून देश विदेशातील आपल्या मराठी बांधवांकरता मी इ प्रतिष्ठान प्रकाशन संस्थेकडून ‘मनोगाथा’ हा माझा कथासंग्रह प्रकाशित करतो आहे.

२००१ साली माझी ही साहित्यिक वाटचाल सुरू झाली. कविता, कथा, स्तंभलेख, गीते लिहिता लिहिता आज माझ्या साहित्यिक वाटचालीला वीस वर्ष पूर्ण पूर्ण झालेली आहेत. या काळात माझे चार संग्रह प्रकाशित झाले आहेत. 'अंतरंग' काव्यसंग्रह (२०११), 'प्रतिभावंतांच्या रंगसावल्या' लेखसंग्रह (२०१४), 'वलयांकित' ललित लेखसंग्रह (२०१५) आणि 'नशा' दीर्घकाव्यसंग्रह (२०१८) अशा संग्रहांचा यात समावेश आहे. या वीस वर्षाच्या काळात अनेक ठिकाणी माझ्या कवितांचे सादरीकरण, अभिवाचन झालेले आहे. 'वलयांकित' च्या माध्यमातून श्रद्धांजलीपर ललित लेखांचे

कार्यक्रम ठाण्यातील विविध संस्थांनी घेतले आहेत. माझ्या या साहित्यिक सामाजिक कार्याचा आढावा घेऊन काही राज्यस्तरीय, राष्ट्रीय संस्थांनी पुरस्कार देऊन मला गौरविले आहे. न्यूज चॅनेल, वृत्तपत्रांनीही या माझ्या कार्याची दखल घेतली आहे. सेलेब्रल पाल्सी हे अपंगत्व असतानाही मी साहित्यक्षेत्रात,





कलाक्षेत्रात येऊन जे उल्लेखनीय कार्य केले आहे, त्याबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून माझे कौतुक होत असते. या प्रतिसादामुळे आणि लोकांच्या आशीर्वादामुळे मी जीवनात सुंदर असे शब्दशिल्प घडवू शकलो. असे मला मनोमन वाटते आहे.

या मनोगाथा कथासंग्रहाच्या निर्मितीत, मला अनेकांचे सहकार्य लाभले आहे. त्या सर्वांच्या सहकार्यामुळे हा कथासंग्रह आज प्रकाशित होत आहे. या सर्व मंडळींचा मी ऋणी आहे. त्याच बरोबर या मनोगताची सांगता करताना मी माझ्या आई-बाबांचे आभार मानतो. त्यांनी माझ्या साहित्यिक वाटचालीवर कायमच शब्दसुमनांची बरसात केली आहे. तसेच सद्गुरु श्री वामनराव पै यांच्या विचार धनातून माझी ही साहित्यिक वाटचाल यशस्वी झाली आहे. सद्गुरु कृपेचा वर्षाव, हाच माझ्या लेखन कार्याचा मूळाधार आहे. वाचक म्हणून आपण सर्वांनी माझ्या या नवसाहित्य कलाकृतीला उदंड प्रतिसाद द्यावा. हीच गणपती चरणी प्रार्थना.

ॲड. रुपेश पवार





# मनोगाथा : अनुक्रमणिका

१) तिच्या या मनतळ्यात
२) त्याने प्रकाशाची वाट दाखवली
३) मला जन्म द्या
४) शेतकरणीची आत्मकथा
५) असं होऊ शकत का?
६) ती होती कारागृहात
७) एक भावनिक संघर्ष
८) सांजेचा सुखमय प्रवास
९) आनंदाचे गोकुळ
१०) तारुण्याच्या उंबरठ्यावरीलं समजूतदारपणा





# तिच्या या मनतळ्यात

त्या दिवशी सायंकाळी तळ्याच्या काठी मी बसले होते. गार वाऱ्याची झुळूक मनाला शांत करत होती. अचानक तिथे एक युगुल आलं, प्रेमात बुडालेलं, आपल्या नादात रमलेलं. सहज मी त्यांना म्हटलं, "आई बाबांनी तुम्हाला हेच शिकवलं"? त्यांनी आजुबाजुला पाहिलं, माझ्याकडे जरा नजर फिरवली. मुलगी थोडी शरमली, तो मात्र तसाच तिला घेऊन गेला. त्याच्या डोळ्यात ती शरम नव्हती, बघता बघता ते दिसेनासे झाले. माझं मन हळहळलं, काय होणार या निरागस कळ्यांचं?, मला समजत नाही, काही उमजत नाही. कोडं पडल आहे, हीच या दुनियेची रित आहे का? पालक नावाच्या वृक्षांची संस्कार सावली वठली तर नाही ना? म्हणून मुलांची प्रणयक्रिडा अवेळी वाढली. ही धुंद सुगंधी फुलं, पुढं कशी बर मोहरणार? त्यांची रुजूवात या अशा भोगाच्या अग्नीत तप्त झालेली. प्रेमाच्या स्पर्शात एक शीतलता असते. ती त्यांच्यात कशी काय मुरणार? आजूबाजूच्या या साऱ्या सृष्टीत, हाच मोहाचा अस्वस्थ गंध दरवळतोय. आपण जातोय का नकळत देहाच्या बाजारात?



ठाऊक आहे मलाही, या तारुण्याच्या उंबरठ्यावर मन असच उथळ होतं. आभासी अशा स्वप्नात मन धुंद होत उधाणतं. आकर्षणाच्या मोहजाळात अडकून, प्रेमात वाटेल तस वाहवतं जात. मग लज्जेचा पदर आणि ओढणीतील अदब रहात नाही. सारं कसं विरुन जातं, सर्व काही खुलं होऊन जातं. तिला वा त्याला याचं काहीच वाटत नाही. ही बेबंध मुक्तता, मला वाटे देहाचा बाजार. हा सारा "अवेळीचा कहर आणि नकोसा वाटणारा बहर," चहूबाजूंनी हा असाच नर मादीचा खेळ सुरु आहे.

एक अफेअर संपलं नाही तर दुसरं अफेअर सुरु. या अशा ज्वानीच्या वणव्यात, माणसाच्या सभ्यतेची होतं आहे राख. हे अस करताना मुलाला नसतं कसलं भय, त्याला निसर्गानेच दिलं आहे अभय. पण तिला मात्र निसर्गानं दिलं आहे गर्भफलन. हे माहित असतानाही ती स्वतःला बेछूटपणे झोकून देते. आधुनिक साधनांचा वापर करत. या बाबतीत तिच मोकळं होतं मन, होतं मोकळं तन आणि होतो मोकळा शृंगार. तो मात्र हे मोकळेपणाने स्विकारतो, आनंद घेतो. अस झालं तरी कोण्या तिसऱ्या व्यक्तीशी लग्न जुळवलं जातं. हल्ली हे अगदी सहज केलं जातं. सार काही विरुन, डोळे झाकून, निमूटपणानं. आई वडील या लग्नकांडात सामील





होतात. गळ्याशी आलेल्या रितीभातीच्या सामाजिक असहायतेनं. ही कुटुंब व्यवस्था अशीच खचत चालली आहे. सभ्यता जीर्ण होऊन वाहत आहे.  वास्तवतेच्या दलदलीत. येळकोट येळकोट म्हणतं.

अशा प्रकारे लग्न संपन्न झाल्यावर, तो स्पर्श अनुभवल्यावर आणि ती मोहाची सारी हद्द पार केल्यावर, मन अस्वस्थ होऊन खातं नाही तिचं त्याचं? हा कसला आहे बिनधास्तपणा? मनाला न लागणारा, न बोचणारा. सार कस खुशखुशीत, अलबेल, मनमुक्त. गतकाळाचा कुठलाही पाश नाही, मनाला पश्चाताप नाही. संसार हा सुरु आहे; आधीच्या परमार्थासोबत. ही रितभात, रुढी नेमकी कुठून उगम पावली?  सिंधूच्या खोऱ्यातून की गंगेच्या खोऱ्यातून, काही कळत नाही. पण ती नक्कीच आली असणार अलीकडच्या काळात, कलिकेच्या पोटातून. म्हणून बऱ्यापैकी समाजमनं ढवळून निघालय- असभ्यतेच्या वर्तनातून. तो गढूळ अर्क बाहेर येतोय. हा अर्क केव्हातरी बसेल का गाळात ?तेव्हा निर्मळ होईल वासनेची मोह, माया. तो दिवस  उजाडेल का नाही? हे काही सांगता येत नाही.





तो दिवस उजाडेल ज्यांच्या आयुष्यात; त्यावेळी त्यांना वैवाहिक जीवनाचा खरा अर्थ समजेल आणि मग त्यांना गतकाळाच्या त्या नको त्या परमार्थाची सल टोचू लागेलं, मनाला वेदनाही होतील. कारण आपण साऱ्या जगाला भ्रमात ठेऊ शकतो. पण मनातील अंतरंगाला भ्रमात ठेऊ शकत नाही. ही आपल्या आत्ममनाची खासियत आहे. म्हणून आता या अधाशी मोह, मायेला, जरा दूर सारावं लागेल. त्यातूनच या उर्वरित नित्य पावन जगाशी आपला खरा परिचय होऊन, समाजावर आलेली ही धुंदी निघून जाइल. या परिवर्तनाला थोडासा वेळ लागेल. हा काही टक्क्यांचा खेळ आहे. प्रत्येकानं मनावर घेऊन, या उमलत्या तारुण्याचा हा संसर्ग दूर करायला हवा. पालकांची आणि सभोवतालच्या समाजाची ही जबाबदारी आहे. ती आपण सर्वांनी पेलावी. मग हे असभ्यतेच कोड सुटेल. प्रश्न सतावणार नाहीत, निकालात निघतील. माझ्या या मन तळ्यात त्या दिवशी, हेच तरंग उमटत होते. शांत अशा गार वाऱ्यात. ते युगुल निघून गेल्यावर.

कथेचे तात्पर्य:- आज सर्वांनी या बाबतीत सामाजिक पालकत्व घेण्याची गरज आहे.





# त्याने प्रकाशाची वाट दाखवली

दिनेशचा हायस्कूलला जाण्याचा पहिलाच दिवस होता. त्याला थोडा उशीर झाला होता. हायस्कूलच्या पायऱ्यांवर पुढे एक सहविद्यार्थी, जरा अडखळत चालत जात होता. त्याचा हात दिनेशने धरला. तो मुलगा म्हणाला, फक्त माझी सोबत कर मी असाच चालतो. दोघात मग परिचयाचा संवाद होतो. त्या मुलाचे नाव अनिकेत असते. अनिकेतच्या मैत्रीत दिनेशला आत्मविश्वास जाणवतो. त्यानंतर प्रत्येकवेळी दिनेशला असं वाटत या अनिकेतला मात करता येईल का नियतीवर? पण तो मात्र मात करत जायचा, ती मात त्याच्यात दिसायची. अनिकेत अपंग होता पण त्याच्या डोळयात चमक होती. दिनेश आणि अनिकेत यांची मैत्री अशीच वाढत गेली.

पुढे ते दोघेही कॉलेजात जाऊ लागले. मैत्रीतल्या बाकांवर इतर मित्रांसोबत ते गप्पागोष्टी करत राहिले. अनिकेत सर्वगुणसंपन्न होता, प्रत्येकाच्या मनामनात तो होता. असा अनिकेत अतिशय लाडका होता. चेहेऱ्यावरुन मुलींचे हात फिराचे पण या स्पर्शांना तो





सहज स्विकारायचा. अशा या अनिकेच्या मनात गैरभाव कधीच नसायचा. प्राध्यापकांचा तो विश्वासू विद्यार्थी होता. अनिकेत मुळेच दिनेशलाही मान सन्मान होता.

आता अनिकेत दिनेशच्या मनातलं ओळखू लागला होता. दिनेश बाजूच्या बाकावर बसणाऱ्या, ऋतू या मुलीवर मनातल्या मनात प्रेम करायचा. ते अनिकेतनी दिनेशच्या नजरेत पाहिलेलं होत. त्यावर दिनेश कधी काही बोलला नाही. अनिकेतने त्या अबोल्यातला होकार ऐकला. मग दुसऱ्या दिवशी अनिकेत ऋतूला घेऊन आला. ऋतूजाला यातलं काहीच ठाऊक नव्हतं. अनिकेत मात्र दिनेश, ऋतूचा प्रिती संगम घडवून गेला. बोलता बोलता अनिकेत दिनेश आणि ऋतूचं लव्हलेटर उलगडूनं निघून गेला. आता ऋतू, दिनेश एकांतीच्या लव्हसागरात डुंबत, ओले चिंब होत, मनातून खुलत गेले. अनिकेतमुळे त्यांच प्रेम जुळून आलं होतं, सातजन्माचं. अनिकेत देवदूतासारखा त्यांच्या सोबत होता.

एक वर्ष असच निघून गेलं. आता अनिकेतच्या मनातही एक कळी उमलून आली. बोलण्या बोलण्यात ऋतूला ते समजून आलं. तिने मग अनिकेतच्या, अपंगत्वाचा न्यूनगंड बाजूला केला.





दिनेशसोबत तिनेही अनिकेतला विश्वासाचा हात दिला. मग ती अनिकेतच्या नीताला घेऊन आली. नकळत ऋतूनं नीताला सहज खुलवलं. ऋतूनं अस करताच त्यांची मनं हलकी झाली. अनिकेत, नीताच प्रेम जुळून येतयं म्हटल्यावर दिनेश, ऋतूला आनंद झाला. ते गप्पा मारता मारता मागे वळून अलगद निघून गेले. मग अनिकेत आणि नीता एकांतीच्या प्रितीसागत धुंद होत, मनमोकळे क्षण जगत, स्पर्शात मिटूनही गेले. अशा प्रकारे कायमच दिनेश, ऋतू अनिकेत, नीताच्या बरोबर राहिले.

कॉलेज संपून आता मधली काही वर्ष गेली. दिनेश त्याच्या संसारात रमला तिकडे अनिकेत त्याच्या.संसारात रमला. दिनेशला चांगली नोकरी होती एक बंगला होता, कार होती आणि ऋतूची छान सोबत होती. अनिकेतचही तसच होतं पण दिनेशसारख नव्हतं. दिनेश आता बंगरुळला रहात होता आणि अनिकेत इथेच मुंबईला. बऱ्याच वर्षात त्या दोघाची गाठ भेट झालेली नव्हती. नंबर गहाळ झाल्यापासून खुशहाली कळली नव्हती. त्यांचा ऋणानुबंध आता फक्त मनात होता. असं सगळं काही छान चाललेल असताना, दिनेशच्या आयुष्यात नियतीनं कायमचा घाला घातलेला असतो. दिनेश आता एका अपघाता नंतर अपंग झालेला असतो. त्यातूनच





दिनेश आत्मघाताचा प्रयत्न करुन बघतो .त्यातूनही तो वाचतो. त्यामुळे आता ऋतू घर सांभाळते. दिनेश आता ऋतूला घेऊन अनिकेतच्या घरी म्हणजे मुंबईत आलेला असतो. परंतु तरीही अनिकेत, दिनेशची भेट होऊ शकत नाही.

पण एके दिवशी अनिकेत ऋतूला दिसतो. हायसं वाटून ऋतू अनिकेतच्या समोर येते. अनिकेत एका झाडा खाली नीताची वाट बघत बसलेला असतो. म्हणून ऋतूला तो दिसतो. ऋतूला पाहून अनिकेतला आनंद होतो. ती बोलता बोलता आपलं मन मोकळं करते. दिनेश अपघातातून अपंग झाला आणि त्यानं आत्महत्येचा प्रयत्न केला. हे ऐकून अनिकेतला फार वाईट वाटत .अनिकेत अवांक होतो. हा संवाद सुरु असतानाच नीताही तिथे येते. ऋतूच्या डोळ्यातील अश्रु पाहून नीता तिला विश्वास देत समजावते. तिचे अश्रु पुसते .तिला हृदयाशी कवटाळते. अनिकेत, नीताच्या सोबतीने, ऋतू जराशी सावरते. ते दोघही ऋतूला घेऊन दिनेशच्या घरी जातात. वाटेत अनिकेतच्या मनात विचार येतात. दिनेशला माझं मनोबळ दिसायला हवं होत. आत्मघात करुन प्रश्न सुटतात का कधी? मला ज्याने आधार दिला, तो आज अंधारात आहे. मी





वाट दाखवेन त्याला प्रकाशाची. हे विचार चक्र सुरु असतानाच दिनेशच घर येतं.

दिनेश अनिकेतला पाहून फार खुश होतो. अनिकेत काठीवर असतो, पूर्वीसारखा तो नसतो. तरी तो मनोबळात कुठेही कमी नसतो. दिनेश त्याकडे बघतच राहतो. अनिकेत त्याला म्हणतो- काय मग दिन्या, हा कसला विचार, आत्मघात करुन, काय साधलं जाणार होतं. ऋतूच्या मनावर काय आघात झाले असतील. आठवत का तुला तिच ते प्रेम? तिला तुझाच ध्यास होता. तुझा अशा निराशाजनक विचारानं ऋतूच मनाच काय? माझंही मन छीनं विछीनं झाल. अशी निराशा येते माणसाला, हे माझ्या शिवाय कोण चांगलं समजू शकतं. माझ्या आयुष्याचा तू आनूभव घेतलास ना? तरी पण तू काहीच शिकला नाहीस माझ्याकडून? अचानक अपंगत्व येतं, ते स्विकारण कठिण असतं. परंतु तुझ्या समोर मी होतो. माझातलं अपंगत्व तुला दिसलं नाही? मग दिनेशने अनवधानाने झालेली आपली चूक मान्य करत, अनिकेतची माफी मागितली. अचानक आलेल्या अपंगत्वामुळे अनिकेतच्या मनोबळाचा विचार दिनेशने केलाच नाही. पण त्यानं आता मनाशी पक्क ठरवलं, काही झालं तरी आशा सोडायची नाही. हा





आत्मविश्वास दिनेशने अनिकेतला बोलून दाखवला. अनिकेतने ऋतूकडे पाहिलं. तिच्या चेहेऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. अनिकेत ऋतूला एका वाक्यात म्हणाला, "बघ मी प्रकाशाची वाट दाखवली या माझा मित्राला." ऋतूला अश्रु अनावर झाले, दिनेशने तिच्या हातात हात दिला, त्या हातात एक विश्वास होता, एक आशा होती. दिनेश आणि ऋतू पुन्हा आनंदी जीवन जगू लागले. ते पाहून अनिकेत, नितानही मोकळा श्वास घेतला. असा या दोन मित्राचा ऋणानुबंध होता.

कथेच तात्पर्य:- आत्महत्येने प्रश्न सुटत नाहीत, म्हणून आपल्या संघर्षमय जीवनावर मात करा. अपंगांचे जीवन पहा, त्या मानाने सर्वसामान्य माणूस सुखी आहे, असा विचार प्रत्येकान करा.





# मला जन्म द्या

प्रमोद आणि प्रियांकाचं लग्न ठरलं होतं, त्यांचा साखरपुडाही झाला होता, त्यानंतर काही कामा निमित्त प्रमोद आपल्या गावी गेला होता. दोन दिवसांच त्याचं एक काम होतं, ते पूर्ण झालं होतं. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला मुंबईला निघायच होतं. रात्री झोपताना प्रमोद आपल्या मोबाईलवर "मुलगी वाचवा" ही शॉर्टफिल्म सहज बघत होता. ती शॉर्टफिल्म बघता बघताच प्रमोदला झोप लागली.

झोपेतच त्याला एक स्वप्न पडलं. तो बस थांब्यावर एस. टी. ची वाट बघत थांबला होता. तेवढ्यात पाऊस पडू लागला. अशा या पावसात समोरून एक मुलगी आली. पाऊस आता थोडा उधाणलेला होता, तो एकसारखा पडत होता. त्या मुलीनं सफेद रंगाचा ड्रेस घातलेला होता. ती मुलगी गोरी गोमटी, सुंदर, रेखीव बांध्याची. जणु ती एक लावण्यवती होती. तीचं नाव स्मृती होतं. प्रमोदने तिच्याकडे पाहिलं, तो मनात म्हणत होता, हिला कुठेतरी मी पाहिलय ,पण कुठे, ते त्याला आठवतं नव्हतं.





आता पाऊसाचा जोर आणखी वाढला होता. बस थांब्यावर एस. टी. काही फिरकेना. सेकंदाची मिनिटं होऊ लागली, एक तास होऊन गेला. त्या स्मृतीला अचानक हुडहूडी भरली. प्रमोदनं बाजूच्या टपरीवरचा चहा मागवला, स्मृतीला तो चहा दिला. तिला हायस वाटलं. चहा घेता घेता मग गप्पा गोष्टी झाल्या. प्रमोदने चहावाल्याला पैसेही दिले. स्मृती पाकिट पाहून म्हणाली," हा फोटो कुणाचा"?. प्रमोद म्हणाला, "माझ्या प्रेयसीचा". मग प्रियांकाचा विषय निघाला.  प्रमोद बोलू लागला.

आता विजाचा कडकडात होऊ लागला. स्मृतीने कानावर हात ठेवला. ती चमकली. बस थांब्या लगतच एक झाड होतं. क्षणभर प्रमोदही घाबरला आणि जरा दूरवर असणाऱ्या एका प्लॅस्टीकच्या शेड खाली प्रमोद स्मृतीला घेऊन गेला. अशा जोरदार पावसानं, गार वाऱ्यानं स्मृतीला पुन्हा थंडी वाजून आली. प्रमोद नाही हो म्हणणार इतक्यातच स्मृती प्रमोदच्या जवळ आली, प्रमोद अवघडला. प्रमोदला असं वाटू लागलं न जणू  अशा या पावसात स्मृतीचा तोल ढळला, तर प्रमोदला स्मृती म्हणू लागेल. माझं तुझ्यावर प्रेम आहे, मला जरा आणखी जवळ घे. पण दोघात तसं काही झालं नाही.





उलट प्रमोदला स्मृती म्हणाली १९७० साली, आपण दोघं एकाच घरात राहात होतो. त्या एका संध्याकाळी स्मृतीला ताप चढला होता. तो ताप थोडा उतरला तेव्हा स्मृतीला जाऊ नको म्हणता स्मृती कॉलेजात गेली. स्मृती कॉलेजातून घरी परत येत असताना, रस्त्यात छत्री वाकडी झाली. स्मृती तशीच भिजत घरी आली. चहा घेताना घरात स्मृती फीट येऊन पडली. तिने या इथल्या जगाचा निरोप घेतला तेव्हा स्मृतीसोबत प्रमोद होता. घरात त्यावेळी कुणी नव्हतं. मोठा भाऊ, आई वडील सर्व बाहेर गेले होते. अशा वेळी प्रमोद बिचारा काय करणार होता. स्मृतीचा देह असा पडलेला पाहून, प्रमोद पूर्ण धास्तावला. त्या धक्क्यानं त्याचीही प्राणज्योत मालवली. या नंतर लगेचच प्रमोदला मनुष्ययोनीत पूनर्जन्म मिळाला, पण स्मृतीच्या बाबतीत तस झालं नाही. आता काही वर्षा नंतर स्मृतीला मनुष्ययोनीत स्त्री जन्म मिळतोय.

परंतु आज इथे सर्वत्र सरास स्त्रीभ्रूण हत्या होते. अशा वेळी आपले जिवलग पूर्वज, स्त्रिच्या नात्यात पुन्हा जन्माला येऊ शकतील का? अशा या वृत्तीमुळे परमेश्वर, निसर्ग, नियती यांच्या करणीलाही माणूस अडथळा निर्माण करतोय. हे सांगायला स्मृती इथे आली होती. आत्म्याच्या स्वरुपात. मग स्मृती प्रमोदला





म्हणली, "दादा तू तरी अशी स्त्रीभ्रूण हत्या करू नकोस, मला जन्म दे. पूर्वजन्मीच्या बहीण भावाच्या या आपल्या नात्याला. आता वडील मुलीच्या नात्याची झालर मिळू दे". हे ऐकून प्रमोदच मन हेलावतं. प्रमोद स्मृतीला जवळ घेतो. आत्मतत्वातील स्मृती अचानक मग गायब होते. प्रमोद 'स्मृती', 'स्मृती' अशी हाक मारताच झोपेतून जागा होतो. त्याला या स्वप्नाची जाणीव होते.

प्रमोद लगबगीने उठतो, तयारी करतो, एस. टी. स्टँडवर जातो, एस. टी. पकडून मुंबईला येतो. प्रियांकाच्या घरी जातो. आपल्या स्वप्नातील हृदयकथा प्रियांकाला सांगतो. असा अपवाद कुठे ना कुठेतरी घडत असतो. तसाच एक संकेत म्हणून हे स्वप्न पडलं असावं. असं प्रमोद आणि प्रियांकाला मनोमन वाटतं. प्रमोद प्रियांकाला सहज म्हणतो, मग आपल्या या स्मृतीला जन्म द्यायचा. ते दोघेही हातात हात घेतात आणि ठरवतात तिला जन्म द्यायचा.

कथेचे तात्पर्य:- स्त्रीभ्रूण हात्या करु नका, मुलगी वाचवा, तिला शिकवा. निसर्गाच्या नियमांमध्ये अडथळा निर्माण करु नका. समाजाचा समतोल बिघडवू नका.



# शेतकरणीची आत्मकथा

"काय सागू बाबा देवा तुला?" माझं कुंकू तू ओढून नेलस. विदर्भात आत्महत्येच पिक आणलस. तो माझा नवरा आत्महत्या करुन निघून गेला. मला तू असं अधांतरी का ठेवलस? आता नवऱ्याचं दुःख किती करत बसायच. अश्रुंमधून त्याला किती काळ गाळायच. माझ्या पदरात त्याची दोन मुलं आहेत. ती अजून खूप लहान आहेत. त्यांना आता वाढवते, चारापाणी घालते. त्यांच्यासाठी हवे ते कष्ट उपसून, घर चालवते. शेतात, काळ्या मातीत माझा देह झिजतोय, भिजतोय, तरी मी मुलांच शिक्षण करते अगदी कोंड्याचा मांडा करुन. मातीत दुष्काळ होता, अजूनही तो तसाच आहे. याच दुष्काळानं माझ्या नवऱ्यानं हाय खाल्ली आणि यम राजाला बोलावून घेतलं. तोच दुष्काळ अजून कुणाला बोलून घेतोय कुणास ठाऊक?. देवा तू नक्की सांग, आयुष्य फाटकं आहे. अजून किती दिवस फाटक राहणार?

या मातीच्या दुष्काळासोबत माझ्या आयुष्याचा विराण दुष्काळ चालूच आहे. मातीवर वरुण राजा कधीतरी, केव्हातरी प्रसन्न होइल. त्या आनंदाच्या भरात चार थेंब पाडेल. त्यातून माती





हिरवीगार होऊन जाईल. पण माझ्या शरीराच्या सुक्या दुष्काळाचं काय? पंचवीसी माझी अजून सरलेली नाही. बाईला शेवटी नवऱ्याचाच आधार लागतो. तिला तो सुखावतो, तिच्या तना मनाला ओलावून टाकतो. पण माझ्या नशिबात नियतीनं ते सुख वाढलचं नाही. फक्त नैवेद्याच ताट भरुन आणलं. थोडासा स्वाद चाखवला मग ते ताट नाहीस झालं. आता नवऱ्याच्या आठवणींचा स्पर्श मला होतो ना तेव्हा तो माझ्यासोबत आहे अस उगाच वाटू लागतं. माझ्या ओठांवर तो आपली याद ठेऊन जातो तेव्हा माझ्या अश्रूंतून त्याचा जीव पुन्हा ओघळतो. 'नाही हा आभास होता', याच भान येत ना मला तेव्हा चांदण्यांची रात्र, आकाशी आलेला चंद्र आणि नदीचं चंदेरी पाणी विरहाच्या अग्नीत मला जाळतं. देवा मी तुझी लेक होते ना? मग तू अस का केलेस, सांग ना मला?

तरी मी दुसऱ्या दिवशी उठते, तयारी करते, मुलांना हाव नको ते बघते. रणरणत्या उन्हात पुन्हा मी खपून जाते. माझ्या नवऱ्यानं आपल्या संसारासाठी, माझ्या सुखासाठी कर्जाचा डोंगर उभारुन ठेवला होता. सुगी आली असती तर कर्जाचा डोंगर खाली घसरला असता, पण आमचं नशिब चिंध्यांच, त्याला काय करणार. आता हा कर्जाचा डोंगर हळूहळू का होईना मला फेडायचाय. सावकारी





आणि बँकेच्या व्याजाची गणित सोडवत. त्यातून ही काळी माती माझ्या हातात राहील का? ते ही काही सांगता येत नाही. सरकारी शाळेत मुलांना शिक्षण मिळतय, ते एक बरं आहे मुलांचा तर प्रश्न सुटला. पोटाची खळगी कशीही भरून काढता येईल. पण शिक्षण पुढे ढकलता  येणार नाही. आता कष्ट करुन कसं तरी जगायच.दिवस पुढे ढकलत, पुढील भविष्याच्या दिशेनं. देवा सुखाचा काळ, पुढे येइल ना? तू सांग मला, निदान मुलांना तरी सुख मिळेल ना?

नवरा जेव्हा होता तेव्हा काही चिंता नव्हती मुलांची. चार हात लागत होते एकमेकांना! पण आता हे दोन हात पुरणार कसे? शेतात राबताना आज त्यावेळचे दिवस मला आठवतात. माझा हा पदर आवडायचा त्याला. म्हणायचा तो शेतात काम केल्यावर तू याच पदरानं तुझा घाम पुसतेस अगदी सहज!! आमच्याकडे बाबा तस काही नाही. मी मग हसायचे नवऱ्याचा घाम याच पदरानं पुसायचे. पण आता तोच पदर शालीसारखा दोन खांद्यावरुन  घट्ट न पडता अंगभर पांघरूण घ्यावा लागतो. कारण

बेरक्या, तिरप्या, नजरा आता माझ्या छातीकडे घिरट्या मारतात अधून मधून. वहिनी, ताई म्हणून जवळ येतात पण त्यांना





एक रखेल हवी असते गावातल्या गावात. गळयात जेव्हा नवऱ्याच मंगळसूत्र होत, कपाळावर त्याच्या कुंकवाचा शिक्का होता तेव्हा हे जग जरा बरं होत. आता मी अभागी त्याला कोण काय करणार?, हे असच पाहाव लागणार निमूटपणे. आता तूच सांग देवा मी कस जगू?

आई वडील म्हातारे, भावाचा संसार जेमतेम चाललाय. वहीनी बोलवत असते मला ती माझी मैत्रिणच आहे. पण ओझ करायला का आपण तिथं जायच? आपलं दु:ख आपल्याकडेच ठेवायच. भावाचा तरी संसार आता निट होऊ दे. मी जगते आता फक्त मुलांच्या मायेपोटी. हीच मुलं भविष्यात मला आधार देतील, मायेची छाया देतील. का ते मला अलीकडच्या शहरी रितीभाती प्रमाणं आश्रमात धाडतील? नाही असं होणार नाही ते तस करणार नाहीत,अस मनोमन मला वाटतं. पण काय सांगाव नियतीनं पुढ काय मांडुन ठेवलय? उद्याच्या वेड्या आशेवर आज हे मन असच जगवायच. नवरा गेल्यापासून मी अशीच वेडी आशा बाळगून आहे. देवा हे असल जगणं कुणाच्याही वाट्याला देऊ नकोस.





कथेचे तात्पर्य:- नवरा आत्महत्या करतो पण बायको घर चालवते ना? याचा विचार शेतकरी बंधूंनी करावा. भर तारुण्यात नवरा गेल्यावर बाई जगते पण तिला भरपूर कष्ट उपसावे लागतात. नको त्या पुरूषी नजरा सहन कराव्या लागतात. म्हणून आत्महत्या करु नका, उगाच बाईला असलं जीणं देऊ नका.





# असं होऊ शकतं का?

डॉक्टर निलेशने नुसतीच सायकॉलॉजीस्टची पदवी घेतलेली होती. त्याचे आई वडील दोघेही एमबीबीएस डॉक्टर होते. एके दिवशी निलेशला संदीप जोशी या संपादक मित्राचा फोन येतो, एका केसच्या निमित्तानं. त्यानुसार डॉ. निलेश केस रिपोर्टिंगकरता कोर्टात जातो. तिथे चाललेली केस बलात्काराची असते. त्या केसचा अंतिम निकाल लागणार असतो. ती केस संवेदनशील झालेली असते. मीडियात ती केस खूप गाजते. अशा खास केसच्या रिपोर्टिंगला निलेश अधूनमधून जात असतो. परंतु या संवेदनशील केसचा निकाल पीडित मुलीच्या बाजूनी लागत नाही. त्या मुलीचं नाव रेखा असतं. ती या दुर्दैवी निकालानं चक्रावून जात खाली बसते. निलेश पुढे सरसावतो, तिला उठवतो, तिला तिच्या आई-वडीलाच्या स्वाधीन करतो आणि तिथून निघून जातो.

एका संध्याकाळी घरी येत असताना एक २३ वर्षीय तरुण रेखाला अडवतो. तो रेखाला ओढून, गाडीत घालून, एका अज्ञात स्थळी घेऊन जातो. तिच्यावर बलात्कार करतो. तो एका उद्योगपतीचा बिघडलेला मुलगा असतो. पैशाचे आमिष दाखवून,





वजन वापरुन, तो प्रकरणाचे सर्व पुरावे नष्ट करतो. त्यामुळे न्यायालयाला सक्षम पुरावे मिळू शकत नाहीत. परिणामी रेखासारख्या सुंदर, सालस, मनाने शांत मुलीवर अन्याय होतो. यातून ती डिप्रेस होते, अन्नपाण्याचा त्याग करते, घरात शून्यात विचार करत बसते, कुणाशी बोलत नाही, कुणाचं ऐकत नाही, अशी विचित्र मानसिक अवस्था रेखाची होते.

दोन दिवसाने निलेश आपल्या क्लिनिकमध्ये बसलेला असतो. त्याचे वडील बाहेर गेलेले असतात. त्यावेळी तिथे आईचा रिपोर्ट दाखवायला संगीता येते. ती रेखाची मैत्रिण असते. निलेशचे वडील तिथे नसल्यामुळे संगीता रिपोर्ट ठेवून निलेशसोबत बोलू लागते. मैत्रिणीकडे जायचं अस म्हणून ती रेखाचा सहज उल्लेख करते. मग निलेश रेखाचा परिचय करुन घेतो, रेखाबद्दल जाणून घेतो. फॅमिली डॉक्टर या नात्यानं संगीता निलेशला रेखाच्या पूर्व आयुष्या बद्दल सगळं काही सांगते. मग संगीतासोबत निलेश रेखाच्या घरी जातो. वाटेत रेखा विषयीच ते दोघ बोलत असतात. बोलता बोलता रेखाचं घर येत.





रेखाच्या घरात गेल्यावर निलेशला रेखाची आई भेटते. ती रेखाच्या डिप्रेशन विषयी विचारते. निलेश रेखाकडे जातो, तिच्या मानसिक अवस्थेला जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. संगीता रेखाशी बोलत असताना, निलेश रेखाच्या आई वडीलांना धीर देतो. त्यांना विश्वास देत म्हणतो, रेखा ही माझी पहिलीच केस आहे. तिला मी नक्कीच बरं करीन, रेखाला या अवस्थेतून बाहेर काढीनं. काळजी करू नका ,असं म्हणून, निलेश परत रेखाकडे जातो. तिच्याशी बोलतो, रेखाच्या मनातील विश्वास वाढवतो आणि आपल्या घरी जातो.

दोन, चार दिवसांनी रेखा, संगीता निलेशला भेटायला येतात तेव्हा रेखा निलेशसोबत निसंकोचपणे बोलून, आपलं मन मोकळ करते. रेखाच्या बोलण्यात एक सच्चेपणा असतो. ती आता मनात काही ठेवत नाही. तिला वास्तवाच भान आलेल असतं. ती म्हणते, मला आणखी कुठे न्याय मागायला जायच नाही. अजून इज्जतीचा पंचनामा करुन घ्यायचा नाही. खरंतर मला आता जगावस वाटतं नाही. पण मी आई वडीलाची एकुलती एक मुलगी आहे. मी जर समजा आत्मघात करुन स्वत:ला संपवलं तर म्हातारपणी माझ्या आई बाबांच काय होईल. म्हणून मी माझा आत्मघाती निर्णय मागे





घेतला. त्याच वेळी त्या रेखाला आपलं लग्न कस होईल हा प्रश्न सतावतो. म्हणून ती निलेशला ते विचारते. या प्रश्नांच निराकरण निलेश करतो. रेखानं केलेला हा सकारात्मक विचार निलेशला आवडतो. निलेशच्या विचारातही एक वास्तवता येते. त्याच्या लेखी बलात्कार म्हणजे एक अपघात आहे. परंतु याचा परिणाम शरीरावर फार काळ रहात नाही पण मनावर त्या अपघाताचा परिणाम फार काळ रहातो. हे अस बोलणं सोपं वाटतं, पण ज्या मुलीच्या आयुष्यात हे घडतं. तिला मात्र या मानसिक अवस्थेतून जाणं कठीण असतं. त्यामुळे हा मानसिक संघर्ष तुला द्यावा लागेल. काळच याच्यावर जालिम औषध आहे. तू काही काळाकरता धीर धरलास, तर कोणी ना कोणीतरी तुझ्यासोबत लग्न करायला तयार होईल. असा निलेशने विश्वास दिल्यावर, रेखाचा आत्मविश्वास अधिक वाढतो, रेखा घरी जायला निघते.

रेखा गेल्यावर रात्री निलेश रेखाचाच विचार करतो. आई वडीलांशी बोलतो, रेखाशी लग्न करण्याचा प्रस्ताव मांडतो. निलेशचे आई वडील विचारा अंती निर्णय घेतात. रेखाला सून करुन घेऊ या, अस म्हणतात. संगीतामुळे रेखाचा आणि तिच्या





कुटुंबाचा परिचय निलेशच्या कुटुंबाला झालेला असतो. निलेश दुसऱ्या दिवशी रेखाच्या घरी जातो, रेखाला मागणी घालतो. रेखाच्या या अवस्थेतही निलेश लग्नाला तयार होतोय. हे ऐकून रेखाचे आई वडील लग्नाला तयार होतात. रेखा खूप खूश होते आणि म्हणते, तुम्ही मला अशा परिस्थितीत हात दिला, तुमच जीवन मी आनंदी, सुखी करणार हे मी तुम्हाला वचन देते. यानंतर लगेचच रेखा, निलेशच लग्न होत.

लग्नानंतर लगेचच रेखा, निलेश गोव्याला जातात. गोव्याला जायचा फक्त एक बहाणा असतो. खर तर रेखाच्या मनाला चेंज मिळावा. जागेच्या बदलामुळे रेखाच्या मनात जीवनाविषयी नवा सूर गवसावा. हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन निलेश रेखाला गोव्याला घेऊन जातो. दोन दिवस गोवा फिरल्यावर रेखाच्या लक्षात येत. निलेश आणि आपण खऱ्या अर्थानं जवळ आलोच नाही. हा मनातील विचार रेखा निलेशला बोलून दाखवते. त्यानुसार निलेश रेखाच्या जवळ येतो. स्पर्श करताच रेखा थरथर कापू लागते. तिला तो भयाण प्रसंग आठवू लागतो. मग तिच हे असं होतच राहतं. मुंबईत आल्यावरही रेखाचं हे असच होत असतं. सहा महिने यातच निघून जातात.





एके दिवशी प्रवासात रेखाला तिच्याच वयाची एक मुलगी भेटते. तिच्यावर बलात्कार झालेला असतो. म्हणून तिच लग्न होत नाही. ती दत्तक मुलीला घेऊन भावासोबत रहात असते. भावाने ही तिच्याकरता स्वत: लग्न केलेल नसतं. ते ऐकून रेखाला वाटतं, मी किती सुखी आहे. मला प्रेमळ नवरा मिळाला आहे. यानंतर रेखा, निलेश खऱ्या अर्थाने एकत्र येतात. रेखाला पुढे दिवस जातात. त्यांच्या घरात पाळणा हलून, कन्यरत्न जन्माला येत. रेखाला जीवनाचा खरा सूर गवसतो आणि ती सुखी होते.

कथेचे तात्पर्य:- आज सर्वत्र मुलींवर हे प्रसंग कोसळत आहेत. गुन्हा करुन नराधम बाजूला होतात. त्याना सजा होते न होते. पण मुलींना यात मोठे दु:ख भोगावे लागते. म्हणून अशा पिडीत मुलींना सहानुभूतीचा हात मिळावा.





# ती होती कारागृहात

कायद्याने दोषारोप सिध्द करुन, व्यक्तीला गुन्हेगार ठरवून, कैदी म्हणून कारागृहात ठेवलं जात. त्यात काही अपवाद असे असतात. व्यक्तीने खऱ्या अर्थाने गुन्हा घडवलेला नसताना, त्याला कैदी म्हणून कारागृहात डामले जाते. सुजाताला ही असच गुन्हेगार ठरवून, कैदी म्हणून कारागृहात डामलेलं होतं. तिच्यावर नेमका कुठला गुन्हा सिध्द झाला होता, ते अजून कुणाला नीटस सांगितल गेल नव्हतं. फक्त नव्या कारागृह अधीक्षकांना ते ठाऊक होतं. आपल्या या शिक्षेबद्दल कुणाला काहीच सांगायच नाही, असा विचार मनात सुजातान केला होता.

पण एके दिवशी या कारागृहात व्याख्यानाचे आयोजन केले होते. 'मन पापमुक्त कसे करावे' हा विषय व्याख्यानाचा होता. लेखिका, प्राध्यापिका विद्याताई देशपांडे व्याख्यात्या म्हणून कारागृहात आल्या होत्या. या कार्यक्रमाच्या संयोजनाची, निवेदनाची पूर्ण जवाबदारी कारागृह अधीक्षकांनी सुजातावर सोपवली होती. विद्याताईंच अप्रतिम व्याख्यान पार पडलं. प्रश्न उत्तराच्या सत्रामध्ये कैद्यानी विद्याताईंना प्रश्न ही विचारले. कार्यक्रम





संपल्यावर विद्याताई चहापाण घेण्याकरता कार्यालयात आल्या. अधीक्षकांशी बोलत असताना, सुजाता तिथे आली. सुजाताची विचारपूस करताना विद्याताई ओघाने बोलल्या. सुजाता तू का प्रश्न विचारला नाही? सुजाता थोडी हसली, आग्रह केला म्हणून बोलू लागली.

सुजाता बी ए झालेली सुंदर व हुशार मुलगी होती. ती क्लास घेता घेता 'एम ए' करत होती. एका भयानं रात्री १० च्या सुमारास सुजाता घरी चालत येत असताना वाटेत तिला तिच्या कॉलेजातील एक वर्ग मित्र भेटतो. तो ओळखीचा असल्यामुळे त्याच्या आग्रहाला मान देऊन, सुजाता त्याच्या घरी जाते. घरी गेल्यावर तो तिची स्याग बाजूला ठेवतो आणि अचानक सुजाताच्या अंगावर येतो. सुजाताची त्याच्या बरोबर झटापट सुरु होते. त्या झटापटीत सुजाता घाबरून, आपल्या स्याग मधील नवीकोरी असलेली सुरी त्याच्या पोटात खुपसते.

त्याने तो रक्ताच्या थारोळयात जमिनीवर आडवा पडतो. त्याचवेळी त्याचे चार मित्र येतात. सामुहिक बलात्काराचा त्यांचा इरादा फसला जातो. ते दार लाऊन सुजाताला तसच आत ठेवून,





पोलिसांना फोन लावतात. पोलिस येतात, सुजाताला घेऊन जातात. पुढे तिच्यावर खुनाचा गुन्हा सिध्द होतो. सुजाताचा तो वर्ग मित्र राजकारणी नेत्याचा नातेवाईक असतो. प्रत्यक्ष पुराव्यातून आणि घटनास्थळी असलेल्या त्या चार जणाच्या साक्षीतून हा गुन्हा सिध्द होतो. सुजाताला या गुन्ह्या खाली जन्मठेप होते, परंतु ही घटना प्रत्यक्ष खुनाची नसते, तर ती स्व संरक्षणाची घटना असते. हे ऐकून विद्याताईंना वाईट वाटत. अपीलाबाबत त्या सुजाताला विचारतात.

पण सुजाताला अपीलात जायच नसतं. कारण अपीलात जाण्यासाठी कुंटुबाच पाठबळ असावं लागतं, ते सुजाताकडे उरलेलं नसतं. कुटुंबाने सुजाताकडे पाठ फिरवली असते. सुजाताच्या कुटुंबीयाना अस वाटत असतं. आपण जर सुजाताला मदत केली, तर बाकी दोन मुलींचे विवाह कसे होतील. किती केलं तरी समाज सुजाताला गुन्हेगारच समजणार आणि तिच्या बरोबर तिच्या कुटुंबालाही. म्हणून सुजाताला कुटुंबानं बेदखल केलेल होतं. हे ऐकल्यावर तर विद्याताई अस्वस्थ होतात. सुजाताला म्हणतात, "आता तू पुढे काय ठरवल आहे"? या प्रश्नावर सुजाता स्तब्ध होते. मग आपलं मन मोकळं करते.





सुजाताच्या नशिबात जे भोग आले आहेत ते तिला निमूटपणे भोगावे लागणाच आहेत, पण या कारागृहा बाहेरच जग तिला कस स्वीकारेल? हाच प्रश्न आता सुजाताला सतावत आहे. समाजाच खुल कारागृह  सुजाताच जीण मुश्कील करणार नाही ना? असा विचार विद्याताईंसमोर मांडताना सुजाता सहज म्हणते. "कारागृहातून सुटल्यावर तुम्ही मला मदत कराल"? त्यावेळी सुजाताला विश्वासक आधार हवा असतो. विद्याताईंनी होकार दिल्यावर सुजाताच्या डोळ्यात आत्मविश्वास जाणवतो. विद्याताई सुजाताला हा विश्वास देऊन, कारागृह अधीक्षकांचा निरोप घेतात आणि कारागृहातून बाहेर पडतात.

कथेचे तात्पर्य:- आपण म्हणतो मुलींनी स्व संरक्षणाचे धडे गिरवले पाहिजेत पण या स्व संरक्षणातून जर अशा घटना घडल्या, तर अशा मुलींना आपण सहानुभूती देऊ का? समाजाच्या प्रत्येक घटकांनी हा विचार करावा.





# एक भावनिक संघर्ष

दिवस मावळतीकडे झुकलेला होता. चंद्रकांत घरी कुठल्यातरी कामात व्यस्त होते. त्यांची बायको सविता तिच्या बहिणीकडे गेली होती. चंद्रकांत यांचा स्वभाव तसा नेहमी शांत असा होता. त्यांना त्यांचे मित्र दिनकर भेटायला येतात. दिनकर नुकतेच नागपूरवरून आलेले असतात. त्यांची मुलगी अर्चना नागपूरला राहात असते. चंद्रकांत दिनकरांना विचारतात, नागपूरच्या संत्र्यांचा विषय काढतात. त्यावर त्यांच्या गप्पा गोष्टी सुरु होतात. त्या गप्पा गोष्टींमध्ये गिरीशचा ही विषय निघतो. गिरीश हा चंद्रकांत यांचा मुलगा. चंद्रकांत काहीच बोलत नाहीत. हळूच पुडी खोलतात.

गिरीश आणि सुन पुजा, आता चंद्रकांत यांच्या सोबत राहत नाहीत. एक वर्षा पूर्वी चंद्रकांत यांची बायको, सविता मनक्याच्या आजारानं बेजार होती. अशावेळी सविताच नाइलाजानं ऑपरेशन करावं लागल होतं. देव कृपेनं त्यांच हे ऑपरेशन निर्विकारपणे पार पडलं. या ऑपरेशनचा सर्व खर्च चंद्रकांतने सविताच्या पेंशन अकाउंटमधून केला होता ,पण त्यांचा मुलगा गिरीश खर्चही करत





नव्हता आणि आईची काळजी ही घेत नव्हता. अशी त्याची कर्मकहाणी होती. गिरिश आपल्याच नादात रंगलेला असा होता. वेळ असला तरी तो ट्रीटमेंट काळातही आईला डॉक्टरकडे घेऊन जात नव्हता. गिरीशची बायको पुजा बँकेत असल्यान संध्याकाळी तिला वेळ असायचा ,पण पूजानीही या काळात आपल्या सासूकडे दुर्लक्षच केल होतं. गिरीश कॉलसेंटर मधून आला की ती दोघ बाहेर निघून जात असत. मनात आलं तर पुजा सासूला मदत कराची पण त्यात कोणत्याही प्रकारचा आपलेपणा असा नव्हता. गिरिषच्या पुढे पुजाचं काहीच चालत नसे.

गिरिश हा कॉलसेंटरमध्ये होता. त्याचा स्वभाव थोडा औली असा होता. त्याचं लग्ना आधी दोन मुलींशी अफेअर होतं. हे पुजाला ठाऊक होतं. त्यामुळे पुजा गिरिश म्हणेल तेंव्हा बाहेर जाण्यास तयार असायची. सर्व बाबतीत तिला गिरिशच समाधान कराव लागायच. या अशा कारणातून घराकडे लक्ष न देणे हा गिरिशचा अवगुण पुजालाही लागला होता. कसतरी करुन गिरीशच्या मामानं गिरिशच हे लग्न लावलं होत. पुजाला गळी उतरवलं होतं. पुजा गिरिशच्या बाबतीत समजूतदार होती, म्हणून गिरिशच निभावलं. याच गोष्टीचा तिटकारा चंद्रकांत यांना होता.





अशा या गिरिशला एक दिवस चंद्रकांत शांतपणाने बोलले. गिरीशला  वडीलाचा रागही आला पण चंद्रकांतला अस करण भाग होतं.

कारण गिरिश आईच्या आजाराकडे अजिबात लक्ष देत नव्हता. त्याच वागणं, बोलण सुज्ञ माणसासारख नव्हतं. म्हणून गिरीशने इथे राहूच नये ,अस चंद्रकांतला वाटत होतं. चंद्रकांत यांनी कायम सुखासीन आयुष्य जगलेलं होत. पुढही त्यांना तसच जगायच होतं. त्यांना आता गिरीशमुळे होणारा भावनिक संघर्ष नको होता. गिरिशने आता आपल्या 'कळव्याच्या' घरी जावून राहावं. असं चंद्रकांत यांनी नक्की ठरवलं होतं. हे बोलताना चंद्रकांतला बाप म्हणून काही वाटेनास झाल होतं. गिरिशच्या आईला मात्र एका मनानं थोड वाईट वाटत होत. त्या आईला पुजाची काळजी होती. गिरीशच्या औली स्वभावामुळे पुजाच काय होइल? याची चिंता तिला लागून राहिली होती. परंतु गिरीशच्या  बेडरकार वागण्यामुळे त्याला कळव्याला पाठवंण गरजेच होत. अस ही त्या माऊलीला वाटत होत. चंद्रकांतची बायको या नात्यानं सविताला





चंद्रकांत यांचा हा निर्णय पटत होता. गिरीशन तेवढा मानसिक त्रास दिलाच होता. म्हणून सवितालाही अस वाटत होतं. त्यामुळे गिरीश कळव्याच्या घरी गेला. पण चंद्रकांतनी अगदी व्यवहाराने गिरीशकडून दरमहा १० हजार भाडही आकारलं होतं. अस करणं चंद्रकांतला मनोमन अजब वाटतं होतं पण चंद्रकांत यांनी आपल्या काळजावर दगड ठेवला होता.

चंद्रकांतने बाप म्हणून दया दाखवली असती, तर गिरीश त्या घरात आरामात राहिला असता. मग त्याला घर कसं घ्यायचं, संसार कसा चालवायचा याची जाणीव सुध्दा झाली नसती. गिरीशचा पगार पुरून उरणारा होता पण आता दहा हजार रुपये भाड असल्यान गिरीशला आता उगाच बाहेरची चैन करता येणार नव्हती. पूजाचा पगारही पूर्णपणे सेव्हिंगला जात होता. आता थोडा खर्चाला जाईल. म्हणजे गिरीशला संसारात तडजोड असते, हे कळू शकेल. लग्न करून गिरीशला जवळपास दोन, अडीच वर्ष झाली होती. अशा प्रकारच जीवन जगल्यावर माणसाला खऱ्या सुखीची किमत कळते. एकुलता एक मुलगा म्हणून, चंद्रकांत आणि सवितानं गिरीशचे फार लाड झाले होते. म्हणून आता तरी त्याला खऱ्या सुखाची जाणीव होइलं. हा एकच हेतू चंद्रकांतच्या या





निर्णया मागे होता. हा असा निर्णय ऐकून, दिनकर विचारात पडतात. सरते शेवटी चंद्रकांत यांना म्हणतात. तुझा हा निर्णय मग बरोबरच आहे.

कथेचे तात्पर्य:- लग्न झाल्यावर जी मुलं आई वडिलांच्या सुखाकडे दुर्लक्ष करतात. अशा मुलांकडे आई वडिलांनी दुर्लक्ष करणे. हे त्यांचे परम कर्तव्य.





# सांजेचा सुखमय प्रवास

माणसाच्या आयुष्यात सुखाची कडा वाढत गेली की दुःखाची पडछाया त्यावर येऊन जाते. मग ते सुख झाकोळलं जात. तसंच काहीसं अविनाश यांच्या आयुष्यात घडलेलं होतं. हे सर्व ऐकून आल्यावर दिनकर यांना उदास वाटू लागलं. त्यांना आपल्या मित्राचं हे दुःख पहावंत नाही ते रात्री झोपेण्याची तयारी करूनही बेडवर न झोपता विचार करत बसतात. त्यांच्या मनाला असं वाटतं. अविनाश, दिनकर कॉलेज वयापासून एकमेकांचे मित्र पण आता दोघांच्या आयुष्यात किती मोठा फरक पडला होता. अविनाशचा मुलगा समजूतदारपणे वागत नव्हता. याचं दुःख दिनकराना अधिक होतं.

दिनकरांचा मुलगा त्या मानाने चांगला होता, सर्वगुणसंपन्न होता. दिनकरांशिवाय तो एकटा राहत नव्हता. आता तो जॉबच्या निमित्ताने अमेरिकेत गेला होता. तरी तो न चूकता, न विसरता कायम फोन करत होता. दीड वर्षा पूर्वी त्याच लग्न झाल होतं. त्याची बायको नीता दिनकरांच्या मित्राची मुलगी होती. हे मित्र पूर्वी जीवाभावाचे शेजारी होते पण आता ते ठाण्यात राहत होते. ही





त्यांची जिवलग मैत्री सहज एका नात्यात बदलून गेली होती. आचानक एक दिवस रतनने, नीताच्या सावंत कुटूंबाला जेवणाकरता बोलावलं होतं. त्याच वेळी नीता, रतनने आपल्या लग्नाचा प्रस्ताव ठेवला. त्याच दिवशी या दोन्ही कुटुंबांनी या लग्नाला सहमती दर्शवली होती. शाळेत असल्या पासूनच नीता, रतनचं एकमेकांवर प्रेम होतं ते दोन्ही कुटुंबांना ठाऊक नव्हतं. अशा प्रकारे हे लग्नसंबंध जुळले गेले. सावंत कुटुंब तस प्रेमळ होतं. त्यामुळे त्यांची नीताही प्रेमळ होती. ती रेल्वेत कामाला होती. रतन आता अमेरीकेला जाऊन एक दीड वर्षच झाल होत. काही दिवसांनी रतन अमेरिकेवरुन येणार होता पण रतन आला तरी तो आधून मधून परदेशी वारी करणारच होता. याचं रतनलाच वाईट वाटत होतं. त्याचं मन म्हणत होतं. रतन जर बाहेर गेला, तर आई-बाबांची काळजी कोण घेणार ही चिंता रतनला सतावत होती. परंतु त्याला ना इलाजान आई-बाबांना असच सोडून जावंच लागणार होतं. म्हणून त्याचं मन त्याला खात होत. ही गोष्ट रतनने अनेकदा दिनकरां◌ंना व आपल्या आईला बोलून दाखवली होती.

ही रतनच्या मनातील तगमग खूप काही सांगून जाणारी होती. तो मनातून म्हणायचा, आई वडीलांनी मुलांना वाढवायच, त्यांची



काळजी घ्यायची. मुलांनी मग व्यवसाय, नोकरीच्या निमित्ताने परदेशी जायच. मनात नसताना आई वडीलांना वाऱ्यावर सोडायचं. मुलांच्या अशा जाण्यामुळे आई वडिलांना खूप सुखसोयी मिळतात, आजारपणात, इतर अडचणीत हा मुलांचा पैसा कामी येतो पण पैशाने माया, ममता, प्रेम आणि जवळ असणं ही भावनिक भूक भागत नाही. असं सरळ रतन म्हणतो पण या रतनला एका गोष्टीचं समाधान होत. रतन घरी नसताना नीता त्याच्या आई बाबांची काळजी घेते. हा रतनला एक दिलासा होता. रतनने कधीही आपल्या संसार सुखाचा स्वार्थीपणाने विचार केलेला नव्हता. त्याला आई-वडिलांशिवाय वेगळा संसार थाटायचा नव्हता. नीता, रतनन मनाशी पक्क ठरवलं होतं जेव्हा आपण दोघं एकत्र येऊ तेव्हाच एकामेकांसाठी वेळ काढू. अस नीता रतनच सहजीवन होतं.

दिनकरांनाही असं नेहमी वाटायच, आपल्या सुस्वभावी मुलानं आपल्या सोबतच रहाव. कारण रतनची होणारी तगमग त्यांना पहावत नव्हती पण तरीही दिनकरांनी त्याला समजवण्याचा खूप प्रयत्न केला ते रतनला म्हणत होते. शेवटी माणसाला काही वाटलं, तरी त्याला वास्तवतेचा स्वीकार करावा लागतो. हे वास्तव





कुणासाठी चुकलेल नाही.  रतन तरीही दिनकरांच म्हणंण समजून घेत नव्हता. दिनकर त्याला हर प्रकारे समजावून सांगत होते. किती नाही म्हटलं तरी मुलींना सासरी जावं लागतं. तसंच हे ही आहे, कामासाठी दाही दिशांना आपल्याला जाव लागत. आपल्या मुलीचं रतनच्या बहिणीच उदाहरण दिनकर देतात. दिनकरांना मनोमन अस वाटतं. आमचा विचार रतनने जास्त करू नये. आपण कुटुंब म्हणून कधीतरी एकत्र येतच आसतो. म्हणून रतनने वाईट वाटून येऊ नये. या मागे दिनकरांनच एकच म्हणण असतं. रतन, नीतान आमच्या सुखासाठी त्यांच्या संसार सुखाचा असा त्याग करु नये. रतनने नीताला आपल्या सोबत घेऊन जावं. एवढं सांगूनही त्या दोघांनी नकाराचा सूर लावला होता. त्या दोघांना आपल्या संसारिक सुखापेक्षा आई-बाबांचं सुख महत्त्वाचं वाटतं होतं. शेवटी दिनकरांनी रतन, नीताच्या हट्टा पुढे आपली विकेट टाकली.

या सर्व गोष्टी दिनकरांना रात्री आठवतात ते मनाने प्रसन्न होतात. अविनाशच्या दु:खात भावनिक संघर्ष आणि आपला सुखमय जीवन प्रवास. या बाबत दिनकर आपल्या बायकोशी बोलतात तेव्हा ते दोघही एकमेकांशी बोलताना म्हणतात. हल्ली





सर्वत्र 'विभक्ती प्रत्यंय' येतो पण आपला मुलगा वेगळ्या विचारांचा आहे. याचं त्यांना फार समाधान वाटतं.

कथेचे तात्पर्य:- मुलांनी जर आपल्या संसार सुखातून. आपल्या आई बाबांना आयुष्याच्या सांजेला समाधानाचा, आपुलकीचा आधार दिला, तर त्या मुलांची सांज सुखमय होईल.





# आनंदाचे गोकुळ

असं म्हणतात ,लग्नाच्या गाठीभेटी स्वर्गात ठरतात, योग जुळतात आणि मग इहलोकी लग्न सोहळे संपन्न होतात. असंच काहीस प्राजक्ताच्या बाबतीत झालं होतं. प्राजक्ताला नाशिकच एक स्थळ चालून आलं होतं. प्राजक्ताचे आई बाबा त्या स्थळाचा विचार करत असताना रवीकाका तिथे येतात. मुलाचा फोटो बघतात ,त्याबद्दल प्राजक्ताच्या आई-बाबांशी बोलतात. मग फोटोतील मंदार जाधव या मुलाला फोन करतात. मंदार रवीकाकांच्या फोनमुळे फार खूश होतो. रवी काका एका प्रवासात मंदारला भेटले होते. त्यानंतर काहीना काही कामा निमित्त ते मंदारला भेटत राहिले. काकांचा स्वभाव जॉली होता. मंदारचाही स्वभाव अतिशय छान होता. बोलता बोतता रवीकाका प्राजक्ताच्या स्थळाचा विषय काढतात. मंदार या स्थळाला होकार देतो. रवीकाकाचे आभार मानतो.

काही दिवसात या स्थळाची बोलाचाली सुरु होते. मंदार, प्राजक्ताचा साखरपुडा होतो. मग प्राजक्ता, मंदारच हळूहळू रोमँटिक बोलणं सुरु होतं. त्यात लग्न कसं करायच, लग्नानंतर हनीमूनला





कुठ जायच अस बरेच काही त्यांच्यात चाललेलं असायचं. त्या निमित्तान अधून मधून प्राजक्ता, मंदार एकमेकांच्या घरी जायचे. मग काही दिवसात लग्नाचा दिवस पुढे उभा राहतो. मंदार, प्राजक्ताच यथासांग लग्न होत. ते हनीमूनला जावून येतात. त्यांचा संसार आनंदात चाललेला असतो. प्राजक्ता मंदारच्या कुटुंबीयांची काळजी घेते. घरात मंदारचे  बाबा, भाऊ, भावजय आणि त्यांचा एक छोटा मुलगा असा परिवार असतो. प्राजक्ता मंदारच्या बाबांची आजारपणात काळजी घेते. मंदारची आई दोन वर्षांपूर्वी वारलेली असते. प्राजक्ता मंदारच्या भाऊ, भावजय यांच्या सोबत भावंडांसारखी राहते. पण काही दिवसांनं प्राजक्ताला आपल्या आई वडिलांकडे जावं लागतं.

प्राजक्ताचा भाऊ आई वडिलांसोबत राहत नाही. प्राजक्ताचे वडील त्याला इस्टेटीतून बेदखल करतात. त्यामुळे आई वडिलांची काळजी प्राजक्ताला घ्यावी लागते. त्याचवेळी मंदारची बदली नव्या मुंबईला होते. मंदारनं ठाण्यात एक घर घेतलेलं असतं. एकदा मंदारच्या बाबांनी प्राजक्ताला सांगितलेल असतं, त्यानुसार प्राजक्ता आपल्या आई वडिलांची काळजी घेते. ती आपल्या ठाण्यातील घरात येऊन राहते. काही दिवसांनी बदली होऊन मंदारही तिथे येतो.





मंदारच्या बाबांना वाटत असतं प्राजक्ताचे आई वडील आपल्याच घरातले सदस्य आहेत. अशा प्रकारे ही दोन्ही कुटुंब एकत्र नांदत असतात.

एके दिवशी प्राजक्ता सकाळी दुध आणायला बाहेर जाते तेव्हा तिला रवीकाका मॉर्निंगवॉक वरुन येताना दिसतात. प्राजक्ता त्यांना आग्रहानं घरी घेऊन जाते. कारण मंदार त्यावेळी घरी असतो. मंदार रवीकाकांना बघून खुश होतो. रवीकाकांना मंदार, प्राजक्ताच नवीन घर आवडतं. रवीकाका घरा विषयी बोलतात, घरच्या गप्पा गोष्टी करतात. मधूनच प्राजक्ताकडे बघून आनंदाच्या ओघात बोलून जातात. प्राजक्ता आम्हाला कधी पेढे, बरफी देणार, त्यावर प्राजक्ता हसते.

कारण प्राजक्ताच्या लग्नाला पाच वर्ष झालेली असतात. या पाच वर्षात  दोन, तीन डॉक्टरांची ट्रीटमेंट प्राजक्ताने घेतलेली असते, पण प्राजक्ताच्या वंधत्वामुळे तिला मुलबाळ होत नाही. प्राजक्ता निराश होते, अशा वेळी मंदार व मंदारचे बाबा प्राजक्ताला समजावतात आणि म्हणतात ,आपण आजून प्रयत्न करु. यश कधी ना कधी आपल्याला मिळेलं. अस म्हणून प्राजक्ताच्या दु:खावर





फुंकर घालतात. त्याचवेळी प्राजक्ताच्या भावाचे प्रताप ऐकन मंदारचे बाबा म्हणतात. तुम्ही मुलं, सुना म्हणून स्वभावाचे फार मनमोकळे आहात, गुणसंपन्न आहात पण येणाऱ्या पुढच्या काळाच काही खरं नाही. प्राजक्ता तुझा भाऊ तुझ्या आई वडीलांशी कसा वागला बघीतलसं ना? म्हणून मुलं होण्याची चिंता प्राजक्ता करु नकोस. अस सर्व प्रकारे समजून सांगितल्यावर प्राजक्ता मनातून आपलं टेन्शन काढून टाकते. नव्या जोमाने आयुष्याला सुरुवात करते. त्यावर रवीकाका म्हणतात, मंदार तुझे बाबा बरोबर म्हणतायतं. आजकाल मुलांचं काही खरं नाही.

मग रवीकाका दत्तकाचा विषय काढतात आणि मंदार, प्राजक्ताला सांगतात. तुम्ही आता दोघानी दत्तकाचा विचार करावा. कारण परकं मुलं केव्हाही चांगल वागतं पण जर का ते मुलं उद्या चांगलं वागलं नाही, तर मनाला दु:ख होणार नाही. शेवटी ते मुलं परकच आहे अस तरी म्हणता येईल. अशा प्रकारे आपलीच आपल्याला समजूत काढता येइल. त्यावर प्राजक्ता, मंदार सकारात्मक होकार देतात. रवीकाका मंदार, प्राजक्ताचा निरोप घेतात.





प्राजक्ता विचार करता करता, मंदारला विचारते. ती दोघं यावर फक्त विचार करत नाहीत, तर कृती करतात. मंदार आपल्या बाबांशी दत्तक मुलं घेण्याबाबत चर्चा करतो. तेही या दत्तकाच्या कल्पनेला होकार देतात. प्राजक्ताला मनातून फार आनंद होतो. अशा प्रकारे त्यांच्या घरात आनंदाच गोकुळ फुलून येतं.

कथेचे तात्पर्य:- अशा सकारात्मक विचारातून मुलं नसलेल्या दाम्पत्याने दत्तक मुलांचा विचार करावा. यातूनच आपल्या जीवनात आनंद निर्माण करावा.





# तारुण्याच्या उंबरठ्यावरीलं समजूतदारपणा

आठवलं त्या वर्षी प्रदीप दहावीला होता ,पण तो दहावीला आहे असं त्याच्याकडे पाहून वाटत नव्हतं. कारण तो अत्यंत खेळकर, मस्तीखोर मुलगा होता. शिक्षकांचा तो नेहमीप्रमाणे ओरडा खात असे. प्रदीप जरी असा असला, तरी त्याच्या मनात एक जबाबदार मुलगा होता. त्यांच्या कुटुंबात तोच मोठा मुलगा होता. त्याचा मूळ स्वभाव मात्र खेळकर होता. एकदा आई त्याला बोलता-बोलता सहज म्हणाली. आपल्या गुड्डूला तुझ्या शाळेत हायस्कूलला घालूया तेव्हा प्रदीप आईला म्हणाला. मी अमोलला विचारतो, अमोलचे बाबा आमच्या शाळेचे संचालक आहेत. अमोल करेल आपलं हे काम. प्रदीप दुसऱ्या दिवशी वर्गात आला. मधल्या सुट्टीत, त्याने अमोलला काल आई काय म्हणत होती ते सांगितलं. अमोलने त्याला होकार दिला. बाबांशी बोलतो मग तुला सांगतो. अस अमोल प्रदीपला म्हणाला.

अमोलन मग संध्याकाळी घरी गेल्यावर त्याच्या बाबांजवळ प्रदीपच्या बहिणीचा विषय काढला. आपण त्यांना ॲडमिशन देऊ शकतो का? असा प्रश्न त्यान बाबांना विचारला. बाबा हो म्हणाले





आणि प्रदीपच्या पालकांना त्यांनी निरोप दिला. त्यानुसार प्रदीपचे पालक अमोलच्या घरी बाबांना भेटायला आले. अमोलच्या बाबांनी प्रदीपच्या बहिणीविषयी विचारपूस केली. दुसऱ्या दिवशी लगेच आपल्या संचालक कोट्यातून प्रदीपच्या बहिणीला ऍडमिशन दिली. प्रदीपचे पालक खुश झाले.त्यानंतर अमोल आणि प्रदीप यांची मैत्री घट्ट झाली. प्रदीपची आई गावावरून रानमेवा जेव्हा कधी आणायची तेव्हा ती हमखास प्रदीपला सांगायची. हे जरा अमोलला देऊन ये. अशी या दोन्ही कुटुंबांची गट्टी जमली होती.

काही दिवसात दहावीची शालांत परीक्षा उरकली. सुट्टीमध्ये प्रदीप आणि अमोल एकमेकांच्या घरी जात होते, बाहेर फिरायलाही जात होते. पुढे तीन महिन्यानंतर जूनच्या पहिल्या आठवड्यात दहावीचा निकाल लागला. प्रदीपला जेमतेम ६० टक्के पडलेले होते. अमोलला थोडे जास्त पण ६५ टक्के पडलेले होते. वेगवेगळ्या महाविद्यालयात प्रदीप आणि अमोलला ऍडमिशन मिळाले होते. प्रदीप कॉमर्सला होता तर अमोल आर्टला होता. प्रदीप कॉलेज कुमार झाल्यावर प्रदीपच्या आईला, प्रदीप बद्दल थोडी भीती वाटायची. मुलांची संगत कशी असेल, त्याला





कोणते व्यसन तर लागणार नाही ना? असे लाख प्रश्न त्या आईच्या मनात यायचे. एकदा प्रदीपची आई अमोलला भेटली. तिने अमोलला प्रदीपवर लक्ष दे असे सहज सांगितले. आपल्या मनातील भीती अमोलजवळ प्रदीपच्या आईने व्यक्त केली.

त्या नुसार अमोल प्रदीपची काळजी घेत होता. त्याला वेळोवेळी समजून सांगायचा पण प्रदीपला या सर्व गोष्टीची जाणिव होती. त्यामुळे वाईट संगतीचा परिणाम त्यावर झालाच नाही. त्यामुळे कुठल्याही प्रकारचे व्यसन त्याला लागलेले नव्हते. मुलं जेव्हा उमलत्या तारुण्याच्या उंबरठ्यावर येत असतात तेव्हा सर्व आयांना हेच प्रश्न सतावत असतात. या वयातली मुलं आई वडिलांशी कमीच बोलतात आणि मित्रात अधिक मिसळतात. यामुळे पालकांना अशी भीती वाटणं स्वभाविक असतं. हीच स्वाभाविकता प्रदीपच्या आईच्या मनात होती पण प्रदीप ज्या परिसरात राहत होता. त्या ठिकांणाचे रहिवासी प्रदीपच्या पालकांना चांगले ओळखायचे, प्रदीपलाही ते ठाऊक होतं. त्यामुळे प्रदीप आपल्या परिसरात चांगली वागणूक ठेवत असे. अमोलही त्याच परिसरात राहत होता. त्यामुळे दोघांनाही जबाबदारीचे भान होते.





कॉलेज चालू असताना एक दिवस प्रदीप नातेवाईकांच्या लग्नाला आपल्या गावी गेला. तिथे एक त्याच्याच वयाची मुलगी त्याच्याशी बोलू लागली, त्यांची मैत्री झाली. ती प्रदीपच्या परिसरात राहात होती. गावावरून आल्यावर प्रदीप कोचिंग क्लासला नेहमी जात असताना. त्याला ती दररोज रस्त्यात भेटायची. परंतु हे तिचे भेटणे, बोलणे प्रदीपला आवडायचे नाही. त्याला सारखं असं वाटायचं या मुलीशी बोलताना आपल्याला कोणीतरी पाहिलं. ही मनातली गोष्ट प्रदीपने त्या मुलीलाही बोलून दाखवली पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. मग त्याने ही गोष्ट अमोलला सांगितली. अमोलला त्याच्या मानसिकतेचा अंदाज आला. अमोल म्हणाला ,आपण तिच्याशी पुन्हा एकदा बोलून बघू. मग अमोलने त्या मुलीला बोलावून घेतले. एकदा अमोलच्या घरी कोणी नसताना. प्रदीप त्या मुलीला घेऊन येतो. अमोल त्या मुलीला समजावतो. आपली भावना सहज व्यक्त करतो.

या वयाच्या टप्प्यावर एखादा मुलागा मुलीला आवडू शकतो. हे अगदी स्वाभाविक असतं. प्रेम करणं, एकमेकांना सोबत फिरणं यात काही गैर नाही. मैत्रीमध्ये असं होतं असतं पण एकमेकांच्या प्रेमात फिरताना. मुला मुलीच पाऊल वाकड पडू शकतं. त्यात





मुलीच आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकत. मुलांची होणारी पुढची प्रगती खुंटू शकते. दुसऱ्या बाजूनं पाहिलं तर हे वय विद्यार्थी दशेच असतं. त्यामुळे या काळात शिक्षणाला अधिक महत्त्व असतं. प्रेमातून वाहवत जाणं, लग्नाच्या गाठी जुळवण हे या वयात योग्य नसतं. आपलं प्रेम खरं असेल, तर ते खऱ्या अर्थानं यशस्वी होऊ शकत. म्हणून प्रेमात बुडून या वयात टाइमपास करणं हे चुकीचं असतं. त्यातही अनोळखा परिसरा असेल, तर असं फिरणं एखाद्या वेळेस चालू शकेल पण जर ओळखीचा परिसर असेल तर मात्र लोकांचा विचार करावाच लागतो. त्यामुळे असं अर्थहीन प्रेम कुणीही करू नये, कारण या वयातील प्रेम फक्त एक आकर्षण असतं, बाकी काही नाही.

हे सारं अमोलन समजून सांगितल्यावर ती मुलगी प्रदीपला पुन्हा कधी भेटली नाही. त्या मुलीच्या प्रेमाच्या आकर्षणातून प्रदीपची कायमची सुटका झाली होती. अमोलन तारुण्याच्या या उंबरठ्यावर मोठा समजूतदारपणा दाखवला होता. याचा आनंद प्रदीपला कायम होता. आता कधीतरी भेटल्यावर हा विषय जेव्हा अमोल, प्रदीप काढतो ,तेव्हा ते दोघही हसतात. प्रदीप म्हणतो, अमोलन माझं पहिलं प्रेम संपवल. अमोल खूप विचित्र प्राणी आहे





पण हे ही कबूल करतो. अमोलन या प्रदीपच जीवन सुरळीत केलं. कदाचित प्रदीप या पहिल्या प्रेमात वाहावत गेला असता तेव्हा अमोल एकच म्हणतो, मैत्रीत आभार मानायचे नसतात.

कथेचे तात्पर्य:- उमलत्या तारुण्याच्या या काळात मुला मुलींनी स्वतःला जपायला हवं. या वयात अनेक प्रलोभन तरुण मनाला आकर्षित करत असतात पण एक विवेकशील माणूस म्हणून सर्वांनी या फसव्या प्रेमाचा विचार करावा.





साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www. esahity. com

esahity@gmail. com



